आधुनिक जीवनशैलीमुळे अकाली हृदयविकार, पक्षाघात

आरोग्य वार्ता



पॅरिस : आधुनिक जीवनशैलीमुळे अकाली हृदयविकार, पक्षाघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. अगदी तरुण किंवा मध्यमवयीन नागरिकांना हृदयविकार व पक्षाघात या आजारांचा सामना करावा लागतो. आरोग्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने आरोग्याचे हे दुष्परिणाम दिसून येत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याने आणि आधुनिक जीवनशैलीचा परिणाम म्हणून कमी वयातच वाढलेला रक्तदाब, मधुमेह, वाढलेले कोलेस्टेरॉल, हायपरग्लायसेमिया, वाढलेला कंबरेचा घेर याने अनेक जण ग्रस्त आहेत. निकृष्ट आहार, अवेळी जेवणे, अपुरी झोप, शारीरिक व्याधींकडे दुर्लक्ष यांचे मोठे दुष्परिणाम दिसून येत असून अनेकांना कमी वयातच हृदयविकार किंवा पक्षाघात जडलेला आहे. या आजारांमुळे अनेकांचा अकाली मृत्यू होत असल्याचेही दिसून येत आहे. स्वीडनमधील प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. लेना लॅनबर्ग यांनी सांगितले की, आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याने मेटाबॉलिक सिंड्रोम नावाचा आजार अनेकांना जडला असून त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघात होऊ शकतो. जागतिक स्तरावर ३१ टक्के जणांना मेटाबॉलिक सिंड्रोम आहे.



मुंबईतील वाहतूक कोंडीवर जोडबोगद्यांचा उतारा

सर्वेक्षण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश


लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई: मुंबईतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी जमिनीवरील उपाययोजनांमध्ये येणाऱ्या मर्यादा लक्षात घेऊन आता जमिनीखाली जोडबोगद्यांच्या (ट्वीन टनेल) माध्यमातून मार्गिका तयार करण्याचा विचार शासन दरबारी सुरू झाला आहे. त्यानुसार शहरातील वाहतूक कोंडीवरील उपाययोजनेसाठी प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे ट्विन टनेल या नवीन संकल्पनेचा वापर करण्याबाबत सर्वेक्षण करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी मुंबई महानगरपालिकेला दिले. तसेच राज्यातील मेट्रोसह विविध पायाभूत सुविधा आणि सिंचन प्रकल्पांना तातडीने गती देऊन हे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

शिंदे यांनी मंत्रालयातील वॉर रूममध्ये राज्यातील दहा महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव मनोज सौनिक यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते. या बैठकीमध्ये प्रामुख्याने पुणे मेट्रो, नागपूर मेट्रो, मुंबई मेट्रो, सिंचन प्रकल्प, समृद्धी महामार्गालगत वित्तीय केंद्र या प्रकल्पांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

मुख्यमंत्र्यांकडून आढावा

- मुंबई मेट्रो मार्गिका ४, ४ ए, आणि ११ साठी मोगरपाडा येथे कारडेपो तयार करण्याकरिता भूसंपादनाच्या विषयाबाबत आढावा घेण्यात आला.
- मिठी नदी विकास व प्रदूषण नियंत्रण प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना मुंबई महानगरपालिका आयुक्तांना यावेळी देण्यात आल्या.
- ठाणे- भिवंडी- कल्याण या मुंबई मेट्रो ५च्या मार्गिकेसाठी कशेळी येथील भूसंपादनाबाबतचा आढावाही यावेळी घेण्यात आला.



पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची कामे राज्यात मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण झाल्यास राज्यातील नागरिकांची मोठी सोय होण्याबरोबरच औद्योगिक विस्ताराला तसेच ग्रामीण भागाच्या विकासाला मोठी मदत मिळणार आहे. त्यामुळे तांत्रिक आणि प्रशासकीय बाबींची तातडीने पूर्तता करत प्रकल्पांना वेग देण्याच्या सूचना शिंदे यांनी दिल्या.

मुंबईत वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी दुभाजक टाकून वाहतूक कोंडीतून नागरिकांची मुक्तता करण्याचे आदेश पालिकेस देण्यात आले. शहरात वाहतूक कोंडीतून सुटका करण्याकरिता पूर्व द्रुतगती महामार्गाला समांतर उन्नत मार्ग बांधता येईल. पण जागोजागी असलेले उड्डाणपूल आणि अरुंद जागा यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर अशी व्यवस्था करण्यात अडचणी आहेत. त्यामुळे न्यूयॉर्कप्रमाणे जमिनीखाली बोगद्याच्या माध्यमातून रस्ते तयार करण्यावर बैठकीत चर्चा झाली. त्यानुसार 'ट्विन टनेल' या नवीन संकल्पनेचा वापर करण्याबाबत महापालिकेला सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले. तसेच पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग जोडण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली.

Anjuman-I-Islam's
M. H. SABOO SIDDIK POLYTECHNIC
D.T.E. CODE 3026
(Government of Maharashtra Aided Institution)
Approved by A.I.C.T.E. New Delhi, D.T. E. (M.S.) & Affiliated to M.S.B.T.E.
8, Saboo Siddik Polytechnic Road, Byculla, Mumbai - 400008. Tel: (O) 2308 4881 / 82
Email: principal.unaided.mhssp@gmail.com Website: www.eventsmhssp.in

ADMISSION NOTIFICATION 2023-24
POST SSC & DIRECT SECOND YEAR DIPLOMA COURSES IN ENGINEERING
Applications are invited for admission to First Year & Direct Second Year Diploma (Aided & Un-Aided) Courses **Against Vacant Seats for CAP & NON CAP** if any and for **Institute Level Quota** (for First Year Un-Aided Courses only).

Sr. No.	Courses	Aided / Un-Aided	Intake Capacity
1	CIVIL ENGINEERING (CE)	Aided	60
2	MECHANICAL ENGINEERING (ME)	Aided	60
3	ELECTRICAL ENGINEERING (EE)	Aided	60
4	COMPUTER ENGINEERING (CO)	Aided	60
5	MECHANICAL ENGINEERING (ME)	Un-Aided	60
6	ELECTRONICS & TELECOMM. ENGG. (EJ)	Un-Aided	60
7	INFORMATION TECHNOLOGY (IF)	Un-Aided	60
8	COMPUTER ENGINEERING (CO)	Un-Aided	60
9	ARTIFICIAL INTELLIGENCE AND MACHINE LEARNING(AN)	Un-Aided	60
10	INTERIOR DESIGNING & DECORATION (IDD)	Un-Aided	80

Note:-
1. Only those candidates who have filled, verified & confirmed documents at facilitation Centers shall be eligible for admission for all types of seats / quota.
2. Candidates are required to fill Registration form at our Institute for against CAP & Institute Level Quota. Last date for sale & acceptance of application form will be 30th August, 2023.
3. Refer the admission schedule & notification for First Year and Direct Second Year on DTE / Institute Website www.dtemaharashtra.gov.in / www.eventsmhssp.in
4. Interior Designing & Decoration (IDD) Non-AICTE Course, admissions are OFFLINE and have to be applied at Institute only up to 30th August, 2023.
5. Vacancy position (First Year) will be declared on Institute website & notice board on 30th August, 2023 at 6.00 pm.
6. All admission and eligibility will be as per the rules / norms of DTE.

Dr. Zahir I. Kazi, Hon. President, Anjuman-I-Islam | Dr. Shaikh Abdullah, Hon. Sr. Vice President, Anjuman-I-Islam | Mr. Aqeel Y. Hafiz, Hon. Gen. Secretary, Anjuman-I-Islam | Dr. Aslam Khan, Hon. Executive Chairman, BVTE, Anjuman-I-Islam

Godrej | PROPERTIES
गोदरेज प्रॉपर्टीज् लिमिटेड
CIN: L74120MH1985PLC035308
नोंदणीकृत कार्यालय : गोदरेज बन, ५वा मजला, फिरोजशानगर, पूर्व द्रुतगती महामार्ग, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०७९, महाराष्ट्र, भारत.
ई-मेल: secretarial@godrejproperties.com; वेबसाईट: www.godrejproperties.com
टेलिफोन नं: ९१ - २२ ६१६९ ८५०० फॅक्स नं: ९१ - २२ ६१६९ ८८८८

सभासदांना सूचना

गोदरेज प्रॉपर्टीज लिमिटेडच्या ('कंपनी') सभासदांना याद्वारे कळविण्यात येत आहे की कंपनी कायदा, २०१३ ('कंपनी कायदा') च्या कलम ११० सहवाचिता कलम १०८ मधील तरतुदी सहवाचिता आणि अन्य लागू तरतुदी, काही असल्यास (वेळेत अमलात आणलेले कोणतेही सांविधिक फेरबदल किंवा पुन्हा केलेले अधिनियम समाविष्ट) सहवाचिता कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ ('नियम') चे नियम २० आणि नियम २२ वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूचीबद्धता बंधने आणि प्रकटन आवश्यकता) अधिनियम, २०१५ ('सूचीबद्धता अधिनियम') चा अधिनियम ४४, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी सर्वसाधारण सभांवरील सचिवीय मानके – २ यांच्या अनुषंगाने आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे जारी करण्यात आलेली साधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित एप्रिल ०८, २०२०, साधारण परिपत्रक क्र.१७/२०२० दिनांकित एप्रिल १३, २०२०, साधारण परिपत्रक क्र. २२/२०२० दिनांकित जून १५, २०२०, परिपत्रक क्र. ३३/२०२० दिनांकित सप्टेंबर २८, २०२०, साधारण परिपत्रक क्र. ३९/२०२० दिनांकित डिसेंबर ३१, २०२०, साधारण परिपत्रक क्र. १०/२०२१ दिनांकित जून २३, २०२१, साधारण परिपत्रक क्र. २०/२०२१ दिनांकित डिसेंबर ८, २०२१, साधारण परिपत्रक क्र. ३/ २०२२ दिनांकित मे ५, २०२२ आणि साधारण परिपत्रक क्र. ११/२०२२ दिनांकित डिसेंबर २८, २०२२ ('एमसीए परिपत्रके') यांनुसार कंपनीने १८ ऑगस्ट २०२३ दिनांकित टपाली मतदान सूचना ('सूचना'), ज्यांचे इमेल पत्ते कंपनीकडे किंवा डिपॉझिटरीज/ डिपॉझिटरी पार्टीसिपंटसकडे नोंदविलेले आहेत आणि ज्यांची नावे कंपनीच्या सभासद नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजच्या देखभालीत असणाऱ्या लाभार्थी मालक नोंदवहीत दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी ('निर्णायक तारीख') नोंदविलेली आहेत अशा सभासदांना, सदर सूचनेत सविस्तरपणे नमूद केलेल्या ठरावांबाबत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानासह टपाली मतदानाच्या माध्यमातून सभासदांची मंजुरी मिळविण्यासाठी, केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविण्याचे काम दिनांक २९ ऑगस्ट २०२३ रोजी पूर्ण केले आहे. त्यानुसार, टपाली मतदान अर्ज व प्रिपेड व्यावसायिक लिफाफा यांसह टपाली मतदान सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती सभासदांना पाठविण्यात आलेल्या नाहीत.

ही सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर www.godrejproperties.com येथे, केफिनटेकच्या संकेतस्थळावर https://evoting.kfintech.com आणि स्टॉक एक्स्चेंजेसच्या संकेतस्थळांवर जेथे कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध आहेत बीएसई लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कंपनीने आपल्या सभासदांना दूरस्थ इ-मतदान सुविधा पुरविण्यासाठी केफिनटेक यांच्या सेवा नियुक्त केल्या आहेत. मतदानाची सुरुवात **बुधवार, ३० ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ९.०० (भाप्वे) वाजता** होईल आणि ते **गुरुवार, २८ सप्टेंबर, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्वे) वाजेपर्यंत** सुरु राहील. उक्त तारीख आणि वेळेनंतर टपाली मतदान किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान यापैकी कोणत्याही प्रकारच्या मतदानास अनुमती नाही. त्यानंतर इ-मतदान यंत्रणा मतदानासाठी निःसमर्थ करण्यात येईल. इ-मतदानाची प्रक्रिया सूचनेचा भाग असणाऱ्या टिपांमध्ये नमूद केलेली आहे. सभासदाने ठरावावर एकदा मत दिल्यावर नंतर त्यात बदल करण्याची अनुमती नाही. सभासदाचे मतदानाचे अधिकार हे निर्णायक तारखेस म्हणजेच २५ ऑगस्ट २०२३ रोजी कंपनीच्या भरणा झालेल्या भाग भांडवलामधील त्यांनी धारण केलेल्या समभागांच्या प्रमाणात असेल.

सूचीबद्ध कंपनींद्वारे पुरविण्यात येणाऱ्या इ-मतदानावरील सेबीच्या परिपत्रक क्र SEBI/HO/CFD/CMD/CIR/P/२०२०/२४२ दिनांकित ०९ डिसेंबर, २०२० नुसार, मतदान प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी वैयक्तिक डिमॅट खातेधारकांसाठी त्यांच्या डिमॅट खात्याद्वारे/ डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टीसिपंटसच्या संकेतस्थळांद्वारे, एकाच लॉगिन अधिकारपत्राचा वापर करून इ-मतदानाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. इ-मतदान सुविधेचा लाभ घेण्यासाठी सभासदांना त्यांचे मोबाईल क्रमांक व इमेल पत्ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटसकडे अद्ययावत करण्याचा सल्ला आहे. इ-मतदानाच्या लॉगिन पद्धतीसाठी तपशीलवार सूचना टपाली मतदान सूचनेत नमूद करण्यात आल्या आहेत.

एमसीए परिपत्रकांच्या अनुषंगाने, सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती सभासदांना वितरीत केल्या जाणार नाहीत. तथापि, दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी कंपनीच्या सभासद असणाऱ्या सर्व व्यक्ती (ज्या सभासदांचे इमेल पत्ते कंपनीकडे किंवा डिपॉझिटरीज/डिपॉझिटरीज पार्टीसिपंटसकडे नोंदणीकृत नसल्याने ही सूचना प्राप्त न होऊ शकलेले सभासदही यात समाविष्ट) या सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवर मत देण्यासाठी पात्र आहेत हे येथे स्पष्ट करण्यात येत आहे. जी व्यक्ती दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी कंपनीची सभासद नसेल तिने ही सूचना केवळ माहिती हेतूकरिता आहे असे मानावे.

ज्या भागधारकांचे इमेल पत्ते डिपॉझिटरीजकडे नोंदविलेले नाहीत अशांसाठी युजर आयडी आणि पासवर्ड मिळविण्याची आणि इ-मतदानासाठी इमेल पत्ते नोंदणीची प्रक्रिया :

१. सभासदांनी खालील लिंकवर क्लिक करावे https://ris.kfintech.com/clientservices/postalballot/registration.aspx आणि तेथे मार्गदर्शन केल्याप्रमाणे नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.
२. इमेलची यशस्वीरित्या नोंदणी झाल्यानंतर, सभासदांना या सूचनेची इलेक्ट्रॉनिक प्रत व इ-मतदान प्रक्रिया तसेच या टपाली मतदानासाठी इ-मतदान सक्रीय करण्यासाठी युजर आयडी व पासवर्ड मिळेल. काही शंका असल्यास, सभासद केफिनटेक यांना einward.ris@kfintech.com येथे लिहून कळवू शकतात.
३. कायमस्वरूपी इमेल नोंदणी करण्यासाठी, सभासदांनी डिपॉझिटरीजकडील इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील भागधारणेसाठी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट्सकडे व प्रत्यक्ष स्वरूपातील भागधारणेसाठी कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्र. ३१ व ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैद्राबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत – ५०० ०३२ यांच्याकडे आपले इमेल पत्ते नोंदविण्याची सभासदांना विनंती आहे.

जे सभासद प्रत्यक्ष टपाली मतदानाद्वारे आपले मत देऊ इच्छितात त्यांनी www.godrejproperties.com किंवा https://evoting.kfintech.com वरील टपाली मतदान अर्जाचा प्रिंटआउट घ्यावा, सर्व तपशील भरून यथोचितरित्या स्वाक्षरी केलेला मतदान अर्ज स्वाक्षर्चाने परिनिरीक्षक श्री. आशिष कुमार जैन द्वारा केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड विभाग: गोदरेज प्रॉपर्टीज् लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्र. ३१ व ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैद्राबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत – ५०० ०३२, यांना गुरुवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत पाठवावा. गुरुवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२३ (सायंकाळी ५:००) नंतर प्राप्त टपाली मतदान अर्ज परिनिरीक्षकांद्वारे विचारात घेतले जाणार नाहीत.

सभासदाद्वारे पाठविण्यात आलेले/देण्यात आलेली टपाली मतदान अर्ज/ इलेक्ट्रॉनिक मते उपरोक्त कालावधीनंतर प्राप्त झाल्यास ती वैध मानली जाणार नाहीत आणि संबंधित भागधारकाद्वारे काही उत्तर प्राप्त झाले नाही असेच मानण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. टपाली मतदान किंवा इ-मतदान यांपैकी केवळ एकच पर्याय सभासद निवडू शकतात. जर सभासदाने टपाली मतदानाद्वारे मत देण्याचा निर्णय घेतल्यास त्यांनी इ-मतदानाद्वारे मत देऊ नये असा त्यांना सल्ला आहे आणि याउलट. जर दोन्ही पर्यायाने मतदान केले असल्यास त्या परिस्थितीत इ-मतदानाद्वारे दिलेले मत विचारात घेतले जाईल आणि ग्राह्य मानण्यात येईल आणि टपाली मतदान अवैध मानण्यात येईल.

मतदानाची प्रक्रिया न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने पार पडावी याची छाननी करण्यासाठी मंडळाने श्री. आशिष कुमार जैन, प्रॅक्टिसिंग कंपनी सचिव, सदस्यत्व क्र. ६०५८ आणि सीपी क्र. ६१२४ यांची परिनिरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

परिनिरीक्षक आपला अहवाल कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष किंवा कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक किंवा कंपनी सचिवांकडे सादर करतील. परिनिरीक्षकांच्या अहवालासह टपाली मतदानाचा निकाल कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.godrejproperties.com येथे आणि केफिनटेकच्या इ-मतदान संकेतस्थळावर म्हणजेच https://evoting.kfintech.com येथे दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी दर्शविले जातील. हे निकाल कंपनीचे समभाग जेथे सूचीबद्ध आहेत त्या बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांनादेखील त्याच दिवशी सूचित करण्यात येतील.

यासंबंधी आणखी काही स्पष्टीकरण हवे असल्यास किंवा काही तक्रारी असल्यास सभासद केफिनटेकला १८००-३०९४-००१ या टोलमुक्त क्रमांकावर संपर्क करू शकतात किंवा evoting@kfintech.com वर इमेल पाठवू शकतात. कोणत्याही शंका/ प्रश्न/तक्रारी असल्यास सभासद नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि https://evoting.kfintech.com वरील 'डाउनलोड' विभागात सभासदांसाठी उपलब्ध असलेल्या इ-मतदान युजर मॅन्युअल यांचा संदर्भ घेऊ शकतात.

गोदरेज प्रॉपर्टीज् लिमिटेड करिता
सही/-
आशिष कार्यकेर
कंपनी सचिव
स्थळ : मुंबई
दिनांक : २९ ऑगस्ट २०२३
(आयसीएसआय सदस्यत्व क्रमांक ए११३३१)

धारावीच्या पुनर्विकासाला आव्हान

प्रकल्पात अदानीकडून अपात्र झोपडीधारकांनाही घरे

राज्य सरकारची उच्च न्यायालयात माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : अदानी समूहातर्फे धारावीचा पुनर्विकास प्रकल्प राबवताना अपात्र झोपडीधारकांचेही पुनर्वसन करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे उच्च न्यायालयात दिली आहे. अदानी समूहाला हा प्रकल्प सोपवताना अपात्र झोपडीधारकांनाही पंतप्रधान आवास योजना अथवा परवडणाऱ्या घरांच्या माध्यमातून धारावी अधिसूचित क्षेत्राच्या दहा किमीच्या परिसरात घरे बांधून देण्याची अट घालण्यात आली आहे, असे सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट केले आहे.

प्रकल्पासाठी रेल्वेची जमीनही अधिग्रहित करण्यात येणार आहे. त्यामुळे, निविदा प्रक्रियेत सर्वाधिक बोली लावून कंत्राट मिळालेल्या अदानी समूहाने रेल्वे जमीन विकास प्राधिकरणाला २८०० कोटी रुपये भरपाई म्हणून द्यायचे आहेत. त्याचप्रमाणे, ८४ हजार चौरस मीटरवर रेल्वे सेवा निवासस्थानांच्या बांधकामाचा खर्चही उचलावा लागणार आहे, ही बाबही प्रकल्पासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबवताना नमूद करण्यात आली होती, असे शासनाच्या वतीने सांगण्यात आले.

सरकारी तिजोरीचे नुकसान नाही

प्रकल्पासाठीचा ८० टक्के खर्च निविदा प्रक्रियेत निवड झालेली कंपनी, तर २० टक्के खर्च झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण उचलणार आहे. त्यामुळे, सरकारी तिजोरीच्या नुकसानाबाबतचा याचिकाकर्त्या कंपनीचा आरोप बिनबुडाचा आहे, असा दावाही सरकारने केला आहे.

सहभागी न होता बिनबुडाचे आरोप

कंपनीला नव्याने राबवण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यापासून कोणी रोखले नव्हते. परंतु, कंपनीने निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला नाही आणि आता जुन्या निविदा प्रक्रियेच्या आधारे ती कंत्राट मिळण्यासाठी पात्र असल्याचा दावा करतानाच निराधार आरोप करत आहे, असेही सरकारने म्हटले आहे.

सोने तस्करीप्रकरणी दोघांना अटक

सव्वाचार कोटी रुपये किमतीचे सोने जप्त

लोकसत्ता खास प्रतिनिधी

सीमाशुल्क विभागाने मुंबई विमानतळावर केलेल्या कारवाईत चार कोटी १९ लाख रुपये किमतीचे सुमारे आठ किलो सोने जप्त करण्यात आले असून, याप्रकरणी श्रीलंकेतील नागरिकासह दोघांना अटक करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. आरोपींनी सोन्याची भुकटी मेणामध्ये लपवून तस्करी करण्याचा प्रयत्न केला. पण केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) जवानांनी त्यांना विमानतळावर पकडले. त्यानंतर सीआयएसएफच्या जवानांनी त्यांना सीमाशुल्क विभागाच्या ताब्यात दिले.

मोहम्मद हिरस व मोहम्मद रुसेत अहमद अशी अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींची नावे आहेत. यापैकी हिरस तमिळनाडूमधील, तर रुसेत अहमद श्रीलंकेतील हमपारा येथील रहिवासी आहे. रुसेतने सोन्याची तस्करी करून विमानतळावर आणले होते. सोने लपवलेली बॅग रुसेतने विमानतळावरून हिरसच्या दिशेने फेकली होती. त्यावेळी सीआयएसएफच्या जवानाने हा प्रकार पाहिला व हिरसला पडून सीमाशुल्क विभागाच्या ताब्यात दिले. त्यावेळी हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. आरोपींनी मेणामध्ये सोन्याची भुकटी लपवली होती. अशा २३ मेणबत्त्या आरोपींकडून जप्त करण्यात आल्या. तपासणीत त्यात ८१०० ग्रॅम सोने सापडले असून त्याची किंमत चार कोटी १९ लाख रुपये आहे.

वैद्यकीय मदत मिळेल, परंतु विशेष सवलत नाही!

डीएचएफएलचे प्रवर्तक धीरज वाधवान यांना उच्च न्यायालयाने सुनावले

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : तुम्हाला आवश्यक वैद्यकीय मदत नक्कीच मिळेल, पण विशेष सवलत मिळणार नाही, असे खडे बोल उच्च न्यायालयाने मंगळवारी डीएचएफएल घोटाळ्यातील प्रमुख आरोपी धीरज वाधवान यांना सुनावले.

वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामीन मंजूर करण्याच्या मागणीसाठी धीरज वाधवान यांनी उच्च न्यायालयात याचिका केली होती. त्यावरील सुनावणीच्या वेळी वाधवान यांची कारागृहाच्या आवारातच वैद्यकीय चाचणी करण्यात यावी, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना रुग्णालयात पाठविण्याची गरज भासल्यास न्यायालय निर्णय घेईल. वाधवान यांच्या वैद्यकीय स्थितीची नक्कीच काळजी घेण्यात येईल. मात्र, अंतरिम जामीन मिळण्यासाठी अवाजवी अथवा खोटी कारणे तयार करू नका, असे न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या एकलपीठाने वाधवान यांना तातडीचा अंतरिम दिलासा नाकारातांना सुनावले. त्याच वेळी, वाधवान यांच्या याचिकेवर सीबीआयला उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले.

वाधवान यांना १३ जुलै रोजी आठ दिवस रुग्णालयात ठेवण्याची परवानगी सत्र न्यायालयाने दिली होती. वाधवान यांच्या रुग्णालयातील मुक्कामाबाबतचा निर्णय डॉक्टर घेऊ शकतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते. या आदेशाविरोधात वाधवान यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यादरम्यान, वाधवान यांना १ ऑगस्ट रोजी रुग्णालयातून सोडण्यात आले आणि त्यांची रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली.

'एआय तंत्रज्ञाना'ने अश्लील छायाचित्रे तयार केल्याचा आरोप

आणखी २३ तरुणींची तक्रार

सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता

मोबाइलमध्ये ९ मुलींची छायाचित्रे...

अर्नाळा सागरी पोलिसांनी आरोपी जीत निजाईच्या मोबाइलमध्ये ९ मुलींची अश्लील छायाचित्रे सापडल्याचे सांगितले. उर्वरित छायाचित्रे आरोपीने नष्ट (डिलीट) केली आहेत. आम्ही आरोपीचा भ्रमणध्वनी तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत (फॉरेन्सिक लॅब) मध्ये पाठवला आहे, असे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी २२ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे प्रत्येक मुलींचा स्वतंत्र गुन्हा दाखल करता येत नाही. आम्ही संबंधित पीडित मुलींचे जबाब नोंदवत आहोत, अशी माहिती पोलिसांनी दिली.

वसई : कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या (आर्टिफिशल इंटेलिजन्स) आधारे तरुणींची अश्लील छायाचित्रे बनविल्याच्या प्रकरणात आता आणखी २३ तरुणी समोर आल्या आहेत. या मुलींनी छायाचित्रे अश्लील संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली असून आंतरराष्ट्रीय कॉल्स येत असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी सखोल चौकशीसाठी थेट पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांकडे तक्रारी करण्यात आल्या असून सीबीआय चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

नालासोपारा पश्चिमेच्या कळंब गावात राहणाऱ्या जीत निजाई (१९) या तरुणाने एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या आधारे तरुणींची अश्लील छायाचित्रे तयार करून ती इन्स्टाग्रामवरील बनावट खात्यातून तसेच अश्लील संकेतस्थळांवर (पॉर्न साइट) व्हायरल केली होती. या प्रकरणी दोन अल्पवयीन तरुणींनी तक्रार दिल्यानंतर अर्नाळा सागरी पोलिसांनी जीत निजाई आणि त्याचा भाऊ यश निजाई याला अटक केली होती. एआय तंत्रज्ञान वापरून करण्यात आलेला हा राज्यातील पहिला गुन्हा होता. या प्रकरणात आता धक्कादायक खुलासा झाला आहे. आणखी २३ तरुणी पुढे आल्या असून आरोपीने अश्लील छायाचित्रे बनविल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आता वाढली आहे.

आम्ही पोलिसांकडे तक्रार देण्यासाठी गेलो होतो, मात्र पोलिसांनी तक्रार घेण्यास नकार दिला, असा आरोप एका पीडित तरुणीने केला. याप्रकरणी तरुणींनी आगरी सेनेची मदत घेतली आणि त्यामार्फत पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांकडे तकार केली आहे. स्थानिक पोलीस या प्रकरणात योग्य तपास करत नाही. या पीडित मुलींना आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून कॉल्स येऊ लागले आहेत. त्यामुळे ही घटना एका आंतरराष्ट्रीय सेक्स रॅकेटचा भाग आहे, असा आरोप आगरी सेनेचे अध्यक्ष कैलास पाटील यांनी केला. या २३ मुलींपैकी सर्वात लहान पीडित मुलगी अवघ्या १३ वर्षांची आहे.

गुंतवणुकीच्या नावाखाली एक कोटीची फसवणूक

मुंबई : सोने गुंतवणूक व इतर विविध योजनांमध्ये गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमीष दाखवून अनेक गुंतवणूकदारांची एक कोटी सहा लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अंधेरी येथील अंबोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

प्रवीणा मोरे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी याप्रकरणी अंधेरी पश्चिम येथील रहिवासी असलेल्या आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपीने दादर येथील एका कंपनीतील सोने गुंतवणूक व इतर योजनेत गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमीष दाखवले. तक्रारदार व त्यांच्या साथीदारांचा विश्वास बसल्यामुळे त्यांनी ७६ लाख ९१ हजार रुपये ऑनलाइन आणि रोख स्वरूपात २१ लाख ५१ हजार रुपये जमा केले. पण आरोपीने ठरल्याप्रमाणे आठ लाख १० हजारांची सोन्याची नाणी व रोख रक्कम असे एकूण एक कोटी सहा लाख रुपये गुंतवणूकदारांना परत केले नाहीत.

केईएम रुग्णालयात २४ तास नियोजित शस्त्रक्रिया

अतिरिक्त आयुक्तांचे आश्वासन

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : केईएम रुग्णालयामधील डॉक्टरांची सेवा दुपारी ४ वाजेपर्यंत असल्याने नियोजित शस्त्रक्रिया सायंकाळनंतर होत नाह